# प्रभाग रचना आक्षेपांच्या सुनावणीस प्रारंभ



या आठवड्यात काढण्यात आली होती. प्रभाग आरक्षणावरील सुचना, आक्षेप, हरकती नोंदविण्यासाठी एक आठवड्याची मुदत देण्यात आली होती. यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून जीवन प्रधिकरणचे सदस्य सचिव संतोषकुमार यांची निवडणूक आयोगाने नियुक्ती केली होती. आज दि. २८ जुलै रोजी स्थायी समितीच्या सभागृहात आक्षेपांची सुनावणी घेण्यात आली. यावेळी महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची उपस्थिती होती.

तत्पूर्वी महापालिकेच्या वतीने संतोष कुमार यांचा सत्कार करण्यात आला. पालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात सुनावणीस प्रारंभ झाला. एकूण ८२ जणांनी प्रभाग रचना, आरक्षण सोडतीवर आक्षेप नोंदविला होता. पहिल्याच दिवशी सुनावणीच्या वेळेस शिवसेनेचे महानगर प्रमुख बाळू उर्फ महेश खोमणे, माजी जिल्हा प्रमुख प्रकाश मारावार, सामाजिक कार्यकर्ते जफरअलीखान पठाण आदींनी संतोष कुमार यांच्याकडे आक्षेप नोंदविला आहे.येत्या ५ ऑगस्ट पर्यंत आक्षेपावर सुनावणी घेण्यात येणार असून त्यानंतर प्राधिकृत अधिकारी संतोषकुमार यांनी आपला अहवाल निवडणूक विभागाकडे सुपूर्द केल्यानंतरच आक्षेपावर निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती पालिकेच्या निवडणुक विभागाकडून देण्यात आली.

# निवडणूक आयोगासमोर आक्षेपांचा पाढा



नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने नव्याने प्रभागरचना आणि प्रभागांचे आरक्षण जाहिर केले आहे. त्यावर ८२ जणांनी आक्षेप नोंदविले होते. त्या आक्षेपांची सुनावणी निवडणूक आयोगाचे संतोषकुमार यांच्यासमोर

## निर्णय ५ ऑगस्टला

झाली. यावेळी अनेकांनी आक्षेपांचा पाढा निवडणूक आयोगासमोर वाचला. आक्षेपासंदर्भात सुधारणा आणि सुनावणी दि. ५ ऑगस्टपर्यंत होणार आहे.

नांदेड मनपाच्या निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोगाने संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रथमतः प्रभागरचना आणि प्रभागातील सदस्यांचे आरक्षण जाहीर केले. त्यावर अनेकांनी आक्षेप घेतले आहेत. एकूण ८२ जणांनी दिलेल्या वेळेत निवडणूक आयोगाकडे आक्षेप नोंदविले होते. त्यानुसार नांदेड महानगरपालिकेत दि. २८ जुलै रोजी निवडणूक आयोगाचे संतोषकुमार यांच्यासमोर आक्षेपांची सुनावणी घेण्यात आली. यात आक्षेपकर्त्यांनी आपले म्हणणे निवडणूक आयोगासमोर सादर करून कशा पद्धतीचे प्रभागांचे क्षेत्र ठरविण्यात आले आहे. काही नगरांना प्रभागातून वगळण्यात यावे, काही प्रभागांत इतर भाग जोडला जावा यासोबतच रस्ते व इतर बाबींना डावलून प्रभागाची रचना तयार केली आहे. याबाबत आक्षेपकर्त्यांनी आपली भूमिका व्यक्त केली. निवडणूक आयोगाने आक्षेपकर्त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकून घेतले. आता या आक्षेपांवर दि. ५ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. माजी विरोधी पक्षनेता बाळू खोगणे, नगरसेविका सौ. सुदर्शना खोमणे, अब्दुल गफार, प्रकाश मारावार यांच्यासह अन्य आक्षेपकर्ते उपस्थित होते. मनपा आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त संतोष कंदेवार या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.